महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय
कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना.

ज्ञा/जिनिप्रस/इतिवृत्त/२०२०/ दिनांक :- २३.१२.२०२०

## जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा/ जिल्हास्तरीय कार्यबल पथक समिती सभा इतिवृत्तांत दि.१४.१२.२०२०

न दि.१४.१२.२०२० रोजी मा.जिल्हाधिकारी, जालना तथा अध्यक्ष यांचे सूचनेनुसार विशेष जिल्हा निर्यात प्रचलन समितीची सभा/ जिल्हास्तरीय कार्यबल पथक समिती सभा जिल्हाधिकारी भागृह येथे संपन्न झाली. यासोबत जोडण्यात आलेल्या यादीनुसार सदस्य सहभागी झाले. सभेच्या सुरुवातीस महाव्यवस्थापक, जिउकें, जालना तथा सचिव यांनी सर्व सहभागी स्वागत करुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली. महाव्यवस्थापक तथा सचिव यांनी सहभागी सदस्यांनी उपस्थित निर्यातदार व निर्यात करु इच्छिणाऱ्या उद्योजकांना त्यांच्या डण्याबाबत सूचित केले. त्यानुसार खालील उद्योजकांनी त्यांचे मुद्दे उपस्थित केले.

| स्यांचे नांव | मुद्दा | चर्चा |
|---|---|---|
| .समीर अग्रवाल | १.निर्यातीमध्ये कृषि मालावर आधारीत उत्पादनांना वाव मिळण्यासाठी समितीद्वारे प्रयत्न व्हावेत. | याबाबत डीजीएफटी व संबंधीत विभागाच्या च्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याबाबत प्रयत्न करावेत असे मा.अध्यक्षांनी सूचित केले. |
| | २.निर्यातदारांना एकाच ठिकाणी निर्यातीकरीता माहिती मिळावी व निर्यात मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात येवून त्याची माहिती सर्व निर्यातदार उद्योजकांना व्हावी. | मा.अध्यक्षांनी चर्चा झाल्यानंतर निर्यातदारांकरीता मार्गदर्शक तत्वांचे पुस्तिका तयार करण्यात येईल असे सूचित केले. |
| | ३.निर्यातीमध्ये मध्यस्थांची अस्तित्वात असलेली साखळी दुर करण्यात यावी. | याबाबत डीजीएफटी च्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यात येईल. |
| .अक्षय घेंही | निर्यात करणाऱ्या लघु उद्योगांना आंतरराष्ट्रीय प्रदर्शनीमधे सहभागी करणे व त्याकरीता शासनाद्वारे प्रोत्साहन देणे. | मा.अध्यक्ष यांचे सहमतीने महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी आंतरराष्ट्रीय प्रदर्शने व पुरस्कार याबाबत उद्योग संचालनालयाद्वारे आंतरराष्ट्रीय प्रदर्शने व उद्योजकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी निर्यात पुरस्काराची योजना आहे. तसेच सहभागी निर्यातदार उद्योजकांना ५०% पर्यंत भुभाडे देण्याची सुविधा आहे. तरी जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याबाबत औद्योगिक संघटना यांनी ही पुढाकार घ्यावा अशी विनंती केली. |
| .आदेश भक्कड | शेतीमालावर आधारीत उत्पादीत उत्पादनांना विक्री व निर्यात होण्याबाबत खरेदीदारांमध्ये विश्वासहर्ता वाढावी या दृष्टीकोनातून प्रयत्न व्हावेत. | डिजीएफटी व कृषि उत्पन्न बाजार समिती यांचे माध्यमातून याबाबत उपाययोजना करण्यात येतील. |
| .यश पुरी | विदेशी चलन हस्तांतरण सुविधा व त्याबाबतचा दर याकरीता जिल्हयात सुविधा व्हावी व मार्केटींगकरीता लिंकअप अडचणीबाबत सहाय्य व्हावे अशी विनंती करण्यात आली. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक व आरबीआय प्रतिनिधी यांचे माध्यमातून याबाबत कार्यवाही करण्यात येईल. |

रोक्त चर्चेअंती मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी सर्व मुद्येनिहाय संबंधीत विभागांशी समन्वय साधून उपाययोजना करण्यात येतील असे सूचित केले. तसेच जिल्हा निर्यात प्रचलनाचा नवकरात लवकर तयार करण्याबाबत इतर सर्व यंत्रणा व सदस्यांनी त्वरीत जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास माहिती सादर करावी. तदनंतर मा.अध्यक्षांच्या परवानगीने सर्व उपस्थितांचे न सभा संपन्न झाल्याचे सचिव तथा महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले.

(श्रीमती के.व्ही.खरात)
महाव्यवस्थापक तथा सचिव,
हा निर्यात प्रचलन समिती, जिल्हा उद्योग केंद्र,

-Sd-
मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जालना जिल्हा निर्यात प्रचलन समिती, जालना